| | |
|---|---|
| MHAU090003912024 | **रे. मु. नं.४७/२०२४**<br>**अर्जुन वि. जगन व इतर** |

## <u>निशाणी नं.५ वरील आदेश</u>

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकत प्रतिवादी क्र. ०१ ने कोणासही कोणत्याही प्रकारे गाहान, दान, विक्री व अन्य प्रकारे हस्तातरण करु नये अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी वादीने सदर अर्ज केला आहे.

अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणे आहेत.

२. मौजे आखातवाडा,ता. पैठण, जि. औरंगाबाद शिवारातील जमीन गट नं.२७२ पुर्ण क्षेत्रफळ ९ हेक्टर ५१ आर पैकी प्रतिवादी क्र. १ च्या नावावरील ०० हेक्टर ३०.५० आर जमीन, आकार १ रुपये , ४८ पैसे जिच्या चतुःसिमा :

| | | |
|---|---|---|
| पुर्वेस | – | संतोष गिरगे यांची जमीन , |
| पश्चिमेस | – | राधाकिशन शेबडे यांची जमीन |
| दक्षिणेस | – | राजु म्हस्के यांची जमीन , |
| उत्तरेस | – | कॅनॉल |

३. येणेप्रमाणे चतुसीमेच्या आतील मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत मिळकत असुन दाव्याचा विषय आहे. प्रतिवादी नंबर २ व ३ व वादी हे आपसात भाऊ बहिण आहे. व प्रतिवादी क्र. १ त्यांचे वडील आहे. दावा मिळकत ही वादीच्या ताब्यात व कब्जे उपभोगत आहेत. दावा मिळकतीमध्ये वादीचा वाटणीसारखा हक्क निगडीत आहे. वादी हा मेहनत मशागत करुन दावा मिळकतीचा उपभोग घेत आला आहे. प्रतिवादी क्र. १ यास दारु, नशापाणी ,बाहेरख्यालीपणाचे व्यसन आहे. त्यामुळे कोणतेही कायदेशीर गरज नसतांना वादीचे उपरोक्ष त्यांचा कायदेशीर हिस्सा डावलुन सन २०२० मध्ये वडोलोपार्जीत

जमीन प्रतिवादी क्र. १ ने विक्री केली आहे. दावा मिळकतीच्या रेकॉर्डला प्रतिवादी न. १ च्या नावाची नोदं आहे. त्यांचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. ०१ त्यांचा व्यसनापोटी दावा मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहे. त्यामुळे दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ने कोणासही कोणत्याही प्रकारे गाहान, दान, विक्री व अन्य प्रकारे हस्तातरण करु नये अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्याची विनंती वादीने केली.

४. वादी तर्फे दाखल करण्यात आलेले कागदपत्रे पुढील प्रमाणे- जमीन गट नं.२७२ ,मौजे आखातवाडा,ता. पैठण, जि. औरंगाबाद शिवारातील जमीनीचे ,क्षेत्रफळ ९ हेक्टर ५१ आर पैकी प्रतिवादी क्र. १ च्या नावावरील ०० हेक्टर ३०.५० आर येथील जमीनीचा ७/१२ उतारा हे कागदपत्रे दाखल केले आहेत.

५. वादी तर्फे दाखल दस्ताऐवजांचे अवलोकन केले. वादीतर्फे युक्तिवाद ऐकला. अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यांचे कारणांसहित निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी दावा वादींचे बाजुने आहे काय ? | ... होकारार्थी |
| २. | अनुकुलतेचा कल वादींचे बाजुने आहे काय ? | ... होकारार्थी |
| ३. | मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे |

**<u>कारणे</u>**

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करिता</u> –**

६. वादीचे म्हणणे आहे की, प्रतिवादी क्र. १ हे त्यांचे वडील असुन त्यास नशापाणी, दारुचे, बाहेरख्यालीपणाचे व्यसन आहे. त्यामुळे कोणतेही कायदेशीर गरज नसतांना वादीचे उपरोक्ष त्यांचा कायदेशीर हिस्सा डावलुन सन २०२० मध्ये वडोलोपार्जीत

जमीन प्रतिवादी क्र. १ ने विक्री केली आहे. दावा मिळकतीच्या रेकॉर्डला प्रतिवादी न. १ च्या नावाची नोदं आहे. त्यांचा गैरफायदा घेवून प्रतिवादी क्र. ०१ त्यांचा व्यसनापोटी दावा मिळकत विक्री करण्याच्या तयारीत आहे. दिनांक ०५–०२–२०२४ रोजी प्रतिवादी क्र. ०१ ने वादीला दावा मिळकत विक्री करण्याची भाषा केली. वादीने अभिलेखावर जमीन गट नं.२७२ ,मौजे आखातवाडा,ता. पैठण, जि. औरंगाबाद शिवारातील जमीनीचा ७/१२ उतारा येथील जमीनीचा ७/१२ उतारा दाखल केला असून त्याचे अवलोकन केले असता मालकी सदरात प्रतिवादी क्र. १ चे नाव दिसत असून वादग्रस्त मिळकतीचे क्षेत्र त्याच्या नावावर असल्याचे दिसून येते. व ती वडीलोपार्जीत मिळकत असल्यांचे दिसुन येते व त्यांत वादीचा कायदेशीर हिस्सा आहे. प्रस्तुतचा दावा वादीने वाटणी करीता आणलेला आहे. जर दावा मिळकत प्रतिवादी क्र. १ ने विक्री केली तर त्यांत वादीचा हिस्सा डावलला जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे अभिलेखावर दाखल असलेल्या कागदपत्रांवरुन प्रथमदर्शनी वादीच्या बाजुने केस आहे. जर वादग्रस्त मिळकत जर प्रतिवादी क्र. १ ने विकली तर वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे वादी तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी हजर होईपर्यंत मिळण्यास पात्र आहे.

७. वरिल चर्चेवरुन दावा प्रथमदर्शनी वादीचे बाजुने आहे, अनुकुलतेचा कल वादीचे बाजुने आहे असे स्पष्ट होते. मनाई हुकूम न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी देण्यात येतात. सबब, मुद्दा क्र. ४ च्या निष्कर्षात खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. नि.५ वरिल अर्ज प्रतिवादी या दाव्यामध्ये हजर होईपर्यंत मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ने कोणासही कोणत्याही प्रकारे गाहान, दान, विक्री व अन्य प्रकारे हस्तातरण करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम प्रतिवादी या दाव्यामध्ये हजर होईपर्यंत देण्यात येतो.

३ प्रतिवादींना या दाव्याचे समन्स / नोटीसा काढण्यात याव्या.

स्वाक्षरीत/-
(आर. के. बाफना/भळगट )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पैठण

पैठण
दि.१६/०२/२०२४